# नियमित दिवाणी दावा क्र.५६/२०१४ मधील नि.३० खालील आदेश

प्रतिवादीने प्रस्तुत अर्ज त्यांच्याविरुध्द विना कैफियत दावा चालविण्याबाबतचा आदेश जो पारीत झालेला आहे तो रदद्बातल ठरवून कैफियत दाखल करुन घ्यावी, वेळेत कैफियत दाखल न करण्यामागचे कारण म्हणजे तो स्वत: वयस्कर असल्यामुळे आजारी असतो. शिवाय कैफियतीकामी जुनी सन १९५० पासूनच्या कागदपत्रांची आवश्यकता होती ती कागदपत्रे वेळेत न मिळाल्यामुळे कैफियत दाखल करता आली नाही. तरी कैफियत दाखल करण्यास परवानगी दयावी,अशा आशयाचा अर्ज केला.

३. वादीने प्रस्तुत अर्जास अर्ज नामंजूर करण्यात यावा अन्यथा खर्चाची आकारणी करुन अर्ज मंजूर करण्यास हरकत नसल्याचे म्हणणे दिले आहे.

४. प्रस्तुत दावा, वादीने प्रतिवादी नं. १ सख्खा भाउ यांच्यामध्ये दावा मिळकत सरस निरस मानाने वाटणी होवून मिळण्याबाबतचा दावा दाखल केला आहे. वाटणीच्या दाव्याच्या कामी वादी आणि प्रतिवादी यांना आपला तोंडी व कागदोपत्री पुरावा आपआपल्या परीने सर्व पुरावा आणणे आवश्यक असते. वादी आणि प्रतिवादी यांच्यामध्ये सख्ख्या भावाचे नाते असल्यामुळे पुराव्याचा प्रत्येक भाग दोघांनाही पूर्णपणे माहित असतो. त्यामुळे कोणताही पुरावा कोणीही लपवून न ठेवता प्रत्येक पुरावा दोघांनाही कोर्टासमोर दाव्यातील वादमुद्दे

अंतिमरित्या निकालात काढण्याकरिता आणण्याची आवश्यकता असते. कारण एका बाजूने काही पुरावा लपवून ठेवल्यास, असा कोणता पुरावा वादीने लपवून ठेवला आहे त्या बाबी निश्चितच प्रतिवादीला साधारणपणे माहित असते. याउलट प्रतिवादीने जरी पुरावा आणला नाही तरी न आणलेल्या पुराव्याबाबत वादीला देखील खात्रीशिररित्या माहिती असते. त्यामुळे दोन्ही बाजूंच्या पक्षकारांनी आपला पुरावा आणावा लागतोच. वादी आणि प्रतिवादी यांच्यामध्ये प्रतिवादी नथुराम हे वादीचे थोरले बंधू असल्याचे दिसते. जरी वयोमान, वृध्दापकाळामुळे आजारी रहात असले तरी नियमात ठरवून दिलेल्या मुदतीत कैफियत दाखल करण्याची जबाबदारी ही प्रत्येकाची आहे. प्रतिवादीने अर्जात दिलेली कारणे संयुक्तिक नाहीत. कारण कागदपत्रांची जुळवाजुळव करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केल्यास निश्चितच ठरवून दिलेल्या कालावधीत कैफियत दाखल करता येवू शकते. मात्र प्रस्तुत अर्ज प्रतिवादीला खर्चाची आकारणी करुन अर्ज मंजूर करण्यात यावा या मतास मी आलो आहे. म्हणून आदेश खालीलप्रमाणे

## **आ दे श**

१. अर्जदाराचा प्रस्तुत अर्ज रक्कम रुपये ३००/-ची खर्चाची आकारणी करण्यात येउन मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाची रक्कम प्रतिवादीने भरल्यास ती रक्कम तालुका विधी सेवा

समिती कडेगांव यांच्याकडे जमा करण्यात यावी.

sdxx

**(वि.र.दासरी)**

**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कडेगांव.**

कडेगांव.

ता.०३.११.२०१५